**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# देसाई महाविद्यालयास नॅक पिअर टीमकडून भेट

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाला नॅक बंगलोर या संस्थेकडून मुल्यांकन करण्यासाठी भेट दिली. या टीमकडून पाहणी करून महाविद्यालयातील प्रत्येक विभागास भेट देत माहिती घेतली. याप्रसंगी महाविद्यालयातील कामकाजाबाबत नॅक पिअर टीमने समाधान व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयात मूल्यांकनासाठी या टीमने भेट दिली. या टीमध्ये नॅक पिअर टीमचे चेअरमन डॉ. सैद अखिल अहमद, समन्वयक डॉ. गुलाम मोहमद भट, सदस्य डॉ. गणेशराम सेथूरमण यांचा सहभाग होता. या टीमने संपूर्ण विभागांची पाहणी केली. मूल्यांकनादरम्यान महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी यांच्याशीही या टीमने संवाद साधून त्यांचा अभिप्राय घेतला. व दिलखुलास चर्चा केली.



**पाटण : बाळासाहेब देसाई महाविद्यालय भेटीप्रसंगी नॅक पिअर टीम.**
**(छाया : सुरेश संकपाळ)**

ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत असावी, एम ए नंतरचे विविध कोर्सेस सुरू व्हावेत, महाविद्यालयातील क्रीडा विभागासाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात आदींबाबत सुचना माजी विद्यार्थ्यांनी करत महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी कलाशिक्षक भास्कर काळे, संदीप भोळे, राजेश पोतदार यांनी आपल्या कलाकुंचल्यातून साकारलेली मान्यवरांची चित्रे त्यांना भेट दिली.

सातारा येथील कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जमीन मोमीन यांनी आभार मानले. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. शिरीष पवार उपस्थित होते.